## कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा

ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र

गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल

अंक ८१/२०२० दिनांक ०९/१० /२०२० कालावधी ५दिवस

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३ /१०/२०२० ते ०९ /१०/२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १० /१० /२०२० सकाळी ८:३० पासून १४ /१० /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/१० | ०४/१० | ०५/१० | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० |
| १.६ | ०.० | ० ०. | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ५ | ० | ० | २ | ० |
| ३१ | ३१ | ३० | ३२.६ | ३१ | ३२.४ | ३२ | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३४ | ३३ | ३४ | ३५ |
| २५ | २४ | २४.५ | २३.५ | २४.५ | २५.५ | २६.५ | किमान तापमान (अं.से) | २७ | २७ | २६ | २६ | २७ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ५ | ७ | ८ | ८ | ८ |
| ८० | ८८ | ९० | ८८ | ८६ | ९२ | ८९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७३ | ७१ | ९३ | ९६ | ९६ |
| ७५ | ८० | ७२ | ७० | ७४ | ७९ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५२ | ४४ | ४७ | ७३ | ७१ |
| २.२ | २.९ | १.६ | २.५ | २.६ | २.२ | १.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ३ | ६ | ४ | ४ |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा | पू. | पू. | आ. द. | आ. द. | आ. द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| १.६ | ३०६२.४ | ४२३३.४ |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक १० व १४ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी अतिशय हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील पाच दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**

**इशारा : दिनांक ०९, १३ व १४ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा व वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

**विस्तारित श्रेणी अंदाजानुसार दिनांक १६ ते २२ ऑक्टोबर, २०२० दरम्यान कोंकण विभागासाठी पर्जन्यमान हा सरासरीपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | • **दिनांक ०९, १३ व १४ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी वादळीवारा व वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे तरी शेतात काम करताना शेतकऱ्यांनी दामिनी एप च्या सहायाने अंदाज घेवून सतर्कता बाळगावी. व अश्या स्थितीत जनावरांना ही सुरक्षित गोठ्यात बांधण्याची व्यवस्था करावी.** |
| भात | दाणे भरणे ते काढणी अवस्था | • पुढील पाचही दिवस पावसाची उघडीप राहून तुरळक ठिकाणी अतिशय हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने पावसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस “वैभव” विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करावी व साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे पावसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची कापणी उरकून घ्यावी. या किडीच्या अळ्या दिवसा फुटव्यात अथवा जमिनीत लपून राहतात आणि रात्री लोंब्याकुरतडतात, त्यामुळे दाणे जमिनीवर गळतात. किडीच्या नियंत्रणासाठी अंडीपुंज आणि अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. निमगरव्या आणि |

| | | |
|---|---|---|
| | | गरव्या जातींवर प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नीम तेल ५० मिली, डायक्लोरोवॉस १२ मि.ली. किंवा सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस पावसाची उघडीप राहण्याची शक्यता असल्याने पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा दुसरा हप्ता द्यावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत. नारळ बागेतील वाळलेल्या झावळ्या गोळा करून नष्ट करून बागेची साफसफाई करावी आणि नंतर खताची मात्रा द्यावी. खते दिल्यानंतर माडास पाणी द्यावे. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास वाढलेल्या फांद्या छाटणी करावी आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकावे व घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी.<br>• पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. यामुळे झाडाला जास्त आणि खोलवर सूर्यप्रकाश उपलब्ध होऊन फळ धारणेत वाढ होईल. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस पावसाची उघडीप असल्याने नवीन लागवड केलेल्या केळी बागेतील तण व रोगट पाने काढून टाकावीत, तसेच केळीच्या झाडांना योग्य भर देवून गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भेंडी** | **पेरणी** | • रब्बी हंगामाकरिता  भेंडी लागवड ४५ x १५ से. मी. अंतरावर करावी त्यासाठी १५ ते २० किलो बियाणे वापरावे. बी रुजत घालण्यापूर्वी पाण्यात किंवा सायकोसिलच्या (१०० मि.ली. प्रति लिटर) द्रावणात २४ तास भिजवून नंतर बियाणे सावलीत कोरडे करून पेरावे जेणेकरून १० ते १५ टक्के उत्पन्न वाढते. |
| **भाजीपाला** | **रोपवाटिका** | • रब्बी हंगामासाठी मिरची, वांगी व टोमॅटोची रोपे तयार करण्याकरिता वाफसा स्थितीत जमिनीची मशागत करून ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादी वाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाणांची पेरणी करावी.<br>• भाजीपाला रोपवाटिका किटक रोधक नायलॉन जाळी मध्ये तयार करावी जेणेकरून रस शोषक किडीचा प्रादुर्भाव होणार नाही. तसेच रोपांचा रूजवा चांगला होण्यासाठी वाफे भाताच्या पेंढयाने अच्छादून घ्यावेत व उगवण होईपर्यंत वाफयांना नियमित पाणी दयावे. |
| **दुभती जनावरे/** | | • फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. यासाठी प्रत्येकी १०० किलो बारीक तुकडे केलेल्या गवतावर ५ ते ६ लिटर पाण्यामध्ये तयार |

| | | |
|---|---|---|
| **शेळ्या** | | केलेले द्रावण (२ कि. गूळ + अर्धा कि. युरिया + १ कि. मीठ) शिपडावे. प्रक्रिया केलेल्या गवताचे थर रचून बाजारात सहज उपलब्ध असलेल्या प्लास्टिक सायलो पूर्ण भरावेत. पाउस आणि उष्णतेपासून संरक्षणासाठी सायलो शेड मध्ये ठेवावेत. अशा पद्धतीने २-३ महिन्यामध्ये मुरघास जनावरांना खाण्यासाठी तयार होतो. |
| **कुकुटपालन** | | • कोंबड्यावरील राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. पक्ष्यांच्या आणि शेडच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.** | | |